दैनिक
बीड महाराष्ट्र | शुक्रवार , 11 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 121 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM





# लोकविश्वासाची शिदोरी घेऊन पुढे जाणारे राजेशभाऊ गित्ते!

**"हौसलों की उड़ान अभी बाक़ी है, इरादे अभी बुलंद हैं,
राह में चाहे जितनी रुकावटें हों, हम हर मोड़ जीतने के पाबंद**

## रस्ता कितीही खडतर असो, पाऊल थांबता कामा नये; कारण ध्येय मोठे असेल, तर संघर्षही तितकाच मोठा असतो."

■ सार्वजनिक जीवनात येणारे अनेक चेहरे काळाच्या ओघात दिसतात आणि अदृश्य होतात; मात्र काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, जी पदामुळे नव्हे तर माणसांशी जोडलेल्या नात्यामुळे कायम स्मरणात राहतात. परळी शहर आणि तालुक्याच्या सामाजिक व राजकीय जीवनात आपल्या कार्यकर्तृत्वाने, सातत्यपूर्ण जनसंपर्काने आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी धावून जाण्याच्या वृत्तीने स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे नाव म्हणजे राजेशभाऊ गित्ते.

## "पदापेक्षा माणूस मोठा"

■ राजेशभाऊंच्या वाटचालीकडे पाहिलं, तर ही केवळ राजकीय पदांची किंवा जबाबदाऱ्यांची कहाणी नाही. ही कहाणी आहे एका कार्यकर्त्याने आपल्या निष्ठेच्या जोरावर उभ्या केलेल्या विश्वासाची... ही कहाणी आहे संकटाच्या वेळी सामान्य माणसाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची... आणि ही कहाणी आहे "पदापेक्षा माणूस मोठा" या विचाराने सार्वजनिक जीवन जगण्याची.

## प्रसिद्धीपेक्षा प्रत्यक्ष कामाला महत्त्व

■ आजच्या काळात एखादे काम करण्यापेक्षा त्या कामाची प्रसिद्धी करणे अधिक सोपे झाले आहे. मात्र राजेशभाऊंच्या कार्यशैलीत प्रसिद्धीपेक्षा प्रत्यक्ष कृतीला अधिक महत्त्व असल्याचे त्यांच्या समर्थकांकडून आणि कार्यकर्त्यांकडून सांगितले जाते. शेतकऱ्यांच्या बांधावर जाणे, कार्यकर्त्यांच्या घरी पोहोचणे, नागरिकांचे प्रश्न ऐकून घेणे, गरजू व्यक्तीला मदतीचा हात देणे आणि प्रशासनाच्या पातळीवर प्रश्न मांडण्यासाठी पाठपुरावा करणे — या छोट्या-छोट्या कृतीतूनच मोठा जनसंपर्क निर्माण होतो. लोकांच्या मनात जागा मिळवण्यासाठी मोठमोठ्या घोषणा नाही, तर सातत्याने केलेली छोटी-छोटी कामे पुरेशी असतात.



## कार्यकर्त्यांना सोबत घेणारा नेता

■ कोणत्याही संघटनेची खरी ताकद तिच्या कार्यकर्त्यांमध्ये असते. कार्यकर्त्यांना केवळ कार्यक्रमाच्या वेळी आठवणे आणि त्यानंतर त्यांच्यापासून दूर जाणे, ही अनेक ठिकाणी दिसणारी कार्यपद्धती आहे. मात्र राजेशभाऊ गित्ते यांनी कार्यकर्त्यांशी सातत्याने संवाद ठेवण्यावर भर दिला आहे. त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, अडचणीच्या काळात पाठबळ देणे आणि संघटनेच्या प्रत्येक उपक्रमात कार्यकर्त्यांना सहभागी करून घेणे, यामुळे त्यांच्याभोवती एक विश्वासाचे वर्तुळ निर्माण झाले आहे.

**पद बदलू शकते...
परिस्थिती बदलू शकते...
राजकीय समीकरणे बदलू शकतात...
पण लोकांच्या मनात निर्माण झालेला विश्वास
सहजासहजी बदलत नाही.**

## वैद्यनाथांच्या चरणी एकच प्रार्थना...

■ प्रभू वैद्यनाथांच्या पावन भूमीत समाजसेवेचा हा प्रवास असाच अविरत सुरू राहो.शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी त्यांचे पाऊल असेच पुढे पडत राहो. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांना अधिक मोठ्या जबाबदाऱ्या मिळोत आणि त्या जबाबदाऱ्यांना न्याय देण्याचे सामर्थ्य त्यांना लाभो. त्यांच्या नेतृत्वाला नवी उंची मिळो, कार्याला नवी दिशा मिळो आणि जनसेवेचा हा प्रवास अधिक व्यापक होवो, हीच मनःपूर्वक सदिच्छा.

- "एकट्याने सुरू केलेला प्रवास जेव्हा लोकांच्या विश्वासाने पुढे जातो,
- तेव्हा तो प्रवास केवळ व्यक्तीचा राहत नाही...
- तो एका कारवाँचा प्रवास बनतो!"*
- राजेशभाऊ गित्ते यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!
- आपल्या कार्याला यशाची नवी शिखरे लाभोत,
- आरोग्य, समृद्धी आणि दीर्घायुष्य लाभो,
- आणि जनसेवेचा हा प्रवास असाच अविरत सुरू राहो,
- हीच प्रभू वैद्यनाथांच्या चरणी मनःपूर्वक प्रार्थना!



## लोकनेता संपर्क कार्यालय भेटीचे ठिकाण नव्हे, विश्वासाचे केंद्र!

■ राजेशभाऊ गित्ते यांचे 'लोकनेता संपर्क कार्यालय' हे त्यांच्या जनसंपर्काच्या कार्यशैलीचे एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे. येथे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा प्रश्न राजकीय गणिताच्या चष्म्यातून पाहण्याऐवजी तो माणुसकीच्या नजरेतून पाहण्याचा प्रयत्न केला जातो. महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथीच्या निमित्ताने वैचारिक उपक्रम, गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान, स्पर्धा परीक्षेत यश मिळवणाऱ्या युवकांचे कौतुक, क्रीडापटूंचा गौरव, सामाजिक-शैक्षणिक आणि वैद्यकीय मदत उपक्रम अशा विविध माध्यमातून समाजाशी असलेली नाळ अधिक घट्ट करण्याचा प्रयत्न त्यांच्या माध्यमातून होताना दिसतो.

## "मैं अकेला ही चला था जानिब-ए-मंज़िल मगर,लोग साथ आते गए और कारवाँ बनता गया।"

■ राजकारणाची खरी ताकद मतांमध्ये नसते ती असते लोकांच्या अडचणीच्या वेळी त्यांच्या पाठीशी उभे राहण्यात. आणि म्हणूनच राजेशभाऊंच्या संपर्कात आलेल्या अनेक सामान्य नागरिकांसाठी ते केवळ राजकीय पदाधिकारी राहिलेले नाहीत, तर "आपला माणूस" बनले आहेत.

## निष्ठा हीच राजकीय वाटचालीची ओळख

■ राजकारणात परिस्थितीनुसार भूमिका बदलणारे अनेक जण दिसतात; मात्र राजेशभाऊ गित्ते यांनी आपल्या राजकीय वाटचालीत निष्ठा, संघटन आणि नेतृत्वावरील विश्वास यांना कायम महत्त्व दिले. महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी नेतृत्व मा. ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या विचारांशी जोडलेली त्यांची निष्ठा आणि माजी खासदार डॉ. प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांच्या मार्गदर्शनातून त्यांनी पक्ष संघटना आणि सामाजिक कार्याची सांगड घातली. कार्यकर्त्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांना सोबत घेणे आणि संघटनेला तळागाळापर्यंत मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे, ही त्यांच्या कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये ठरली आहेत.

## पद मिळालं म्हणून नव्हे, जबाबदारी मिळाली म्हणून काम!

■ भारतीय जनता पार्टीचे परळी तालुकाध्यक्ष तसेच वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना, गोपीनाथगड पांगरीचे संचालक म्हणून विविध जबाबदाऱ्या सांभाळताना राजेशभाऊंनी पदाकडे प्रतिष्ठेचे साधन म्हणून नव्हे, तर जबाबदारीचे माध्यम म्हणून पाहिले. शेतकरी, कामगार, युवक, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांशी जोडलेले राहणे, कार्यकर्त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहणे आणि संघटनेतील प्रत्येक घटकाला विश्वासात घेणे, यामुळे त्यांचा जनसंपर्क अधिक व्यापक होत गेला. त्यांच्यासाठी नेतृत्व म्हणजे केवळ व्यासपीठावर भाषण करणे नाही; तर गरज पडली तेव्हा सर्वात आधी घटनास्थळी पोहोचणे, ही नेतृत्वाची खरी व्याख्या आहे.

## "फोन केला की धावून येणारा माणूस..."

■ सामान्य नागरिकासाठी सर्वात मोठी गोष्ट असते ती म्हणजे — "आपल्या अडचणीच्या वेळी आपल्यासोबत कोण उभं राहणार?" याच प्रश्नाचे उत्तर अनेकांना राजेशभाऊ गित्ते यांच्या रूपाने मिळते. तहसील कार्यालयातील काम असो, पोलीस प्रशासनाशी संबंधित प्रश्न असो, वीज वितरणाचा प्रश्न असो, पीकविमा किंवा शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईचा विषय असो, दुष्काळी परिस्थितीतील मदतीचा प्रश्न असो किंवा शासकीय रुग्णालयातील एखादा आपत्कालीन प्रसंग असो — प्रश्न कोणाचा आहे यापेक्षा प्रश्न किती गंभीर आहे, याला प्राधान्य देण्याची त्यांची कार्यशैली अनेकांना भावते.

- **नेता मोठा होतो तो पदामुळे नाही; तर त्याच्या मागे उभ्या असलेल्या माणसांच्या विश्वासामुळे.**
- **"परिस्थिती आपल्या बाजूने असेल तेव्हा पुढे जाणे सोपे असते**
- **पण परिस्थिती विरोधात असतानाही ध्येयाशी प्रामाणिक राहणे, हीच खरी नेतृत्वाची कसोटी असते."**






नितीन सोपानराव ढाकणे
तालुकाध्यक्ष डिजिटल मीडिया परिषद
दैनिक अतुल्य महाराष्ट्र वृत्तसमूह
दैनिक | वेबसाईट | पोर्टल | न्यूज चैनल

# संपादकीय

## बिघडलेल्या हवेचे वर्तमान

मुंबईची हवा सध्या पूर्ण बिघडली आहे. राजकारणाने नाही; हवेतील धुलीकणांनी. राज्यात नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुका सुरू असल्याने राजकीय धुरळा सध्या महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात उडतो आहे. मुंबईलगतच्या जिल्ह्यांमध्ये नेत्यांच्या झुंजी लागल्या आहेत. पण, महानगरपालिकांच्या क्षेत्राने वेढलेल्या मुंबईपासून या नगरपालिका थोड्या अंतरावर असल्याने त्या मैदानावरची धूळ मुंबईत पोहोचण्याचा प्रश्न नाही. मुंबईची हवा बिघडली आहे, ती मुंबईतल्याच घटकांमुळेच. सरकारी यंत्रणांनी याही बाबतीत आपल्यावरची जबाबदारीची धूळ झटकताना इथिओपियातील ज्वालामुखीचं कारण पुढे करून पाहिलं. पण, न्यायालयाने ऐकलं नाही. इथियोपियातल्या ज्वालामुखीतून उडालेल्या राखेचा काही अंश भारतीय अवकाशात आला आणि त्याचा काही भाग मुंबईच्या आकाशात पसरल्याने या आठवड्यात विमानसेवा विस्कळीत झाली होती, हे खरं. पण, न्यायालयाने या यंत्रणांना सुखासुखी सोडलं नाही. 'त्या राखेचं कारण सांगू नका. राख आली असली, तरी तिकडे ज्वालामुखीचा उद्रेक होण्याआधीही इथली हवा बिघडलेलीच होती. त्याचं कारण काय ते सांगा', असं न्यायालयानेच खडसावल्याने यंत्रणांना दुसरं कारण पुढे करावं लागलं. उगीच परकीय कारणांवर जबाबदारी झटकून मोकळं कशाला व्हायचं? बरं, या यंत्रणांना वायू प्रदूषण मान्य नाही, असं नाही. हे प्रदूषण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची यादी त्यांनी करून ठेवली आहे. वायू प्रदूषण किती पातळीपर्यंत सहन करायचं, प्रदूषणाची पातळी सलग तीन दिवसांपेक्षा अधिक २०० एक्यूआयपेक्षा वर राहिली, तर कोणी काय करायचं हेही ठरलं आहे. अधिकाऱ्यांच्या संयुक्त जबाबदाऱ्याही निश्चित आहेत. पण, तरीही 'शक्यतो काहीच करावं लागलं नाही तर उत्तम' या मुरलेल्या वृत्तीने इथिओपियाच्या ज्वालामुखीवर खापर फोडण्याचा प्रयत्न झाला. हवेतलं वायू प्रदूषण मोजण्यासाठी मुंबईत अनेक ठिकाणी मापन यंत्र बसवलेली आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, आयआयटी बॉम्बे आणि महानगरपालिका या तीनही यंत्रणांची यंत्र हवेची गुणवत्ता तपासत असतात. पण, दुर्दैवाने त्यात कुठेही सुसूत्रता दिसत नाही. अनेक यंत्र एकतर नादुरुस्त किंवा बंदच आहेत की काय कोणास ठाऊक? कारण, या यंत्रणांच्या अनेक केंद्रांवरची हवेच्या गुणवत्तेची आकडेवारी या महत्त्वाच्या दिवसांतही उपलब्ध नाही! याच यंत्रणेला न्यायालयाने आता सर्व बांधकामांच्या ठिकाणी हवेची शुद्धता मापक यंत्र बसवण्याचे आदेश दिले आहेत. बांधकामांच्या ठिकाणांची हवेची गुणवत्ता तपासा, जिथे हवा धोक्याच्या पातळीपर्यंत प्रदूषित असेल, तिथली बांधकामं तातडीने काही काळ थांबवा, असं न्यायालयाने आदेशात म्हटलं आहे. हे आदेश देताना अर्थात प्रकल्पाच्या आर्थिक गणिताचा विचार करायची सूचनाही केली आहे. न्यायालयाने दाखवलेली ही काळजी यंत्रणांसाठी (आणि संबंधित कंत्राटदारांसाठीही) पळवाट म्हणून उपयोगाला येईल, यात शंका नाही. दिल्लीतलं वायू प्रदूषण कमी दाखवण्यासाठी तिथल्या यंत्रणांनी हवेच्या गुणवत्ता मापक यंत्रांच्या भोवती पाणी मारण्यासाठी कसे टँकर लावले होते, हे आपण पाहिलेच आहेत. असे उपाय जे करतात, तेही याच प्रदूषित हवेतून श्वास घेतात. त्यांची कुटुंबही याच हवेतून प्राणवायू मिळवत असतात. पण, आपल्याकडे स्वतःच्या आणि इतरांच्या जगण्याच्या गुणवत्तेचा विचारच नसल्याने केवळ काही आमिषापोटी अशा गोष्टी केल्या जातात. आपण आपल्याबरोबरच इतरांचं आरोग्यही पणाला लावतो आहोत, याची जाणीव यांना नसते. त्यामुळे, मुंबईतही वेगळं काही घडेल, असं मानायला मन धजावत नाही. दिल्लीच्या वायू प्रदूषणाची तक्रार वर्षानुवर्ष आहे. उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब अशा जवळच्या राज्यांतील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतातलं धसकट पेटवल्याने होणाऱ्या धुराने दिल्लीतली हवा बिघडते, असं वर्षानुवर्ष सांगितल्यानंतर यावर्षी या यंत्रणांनी वाहनांच्या वाढत्या उत्सर्जनाने हे प्रदूषण होतं आहे, असं सांगायला सुरुवात केली आहे. दिल्लीत घरात हवा शुद्ध करणारी यंत्र लागली आहेत. लोक ऑक्सिजनची पिशवी घेऊन, त्याची नळी नाकाला लावून फिरत नाहीत. पण ते दिवसही फार दूर नसतील. दिल्लीशी स्पर्धा करणाऱ्या मुंबईतही वेगळं काही घडणार नाही. समुद्रकिनारी असल्याचा फायदा नेहमी मिळत राहीलच असं नाही. ला निनाच्या प्रभावाने वाऱ्याच्या दिशा सतत बदलत आहेत. हे वारेच मुंबईचा श्वास कोंडल्याशिवाय राहणार नाहीत! महापालिकेने सध्या मुंबईतल्या वायू प्रदूषणाचं खापर शहरातील बांधकामांवर फोडलं असलं तरी ते एकमेव कारण नाही. कारवाईला जे सोपं असतं, ते कारण नेहमी पुढे केलं जातं. मुंबईतल्या प्रदूषणाला कारण वाहतूक कोंडीच आहे. सार्वजनिक व्यवस्था पंगू केल्याने मुंबईकरांना रोजच्या प्रवासासाठी खासगी गाड्या किंवा भाड्याने रिक्षा-टॅक्सी वापरण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. मुंबई वाढते आहे आणि मुंबईची आदर्शवत 'बेस्ट' सेवा रोडावते आहे. या सेवेच्या गाड्यांमध्ये वर्षागणिक वाढ व्हायला हवी होती, जुन्या मार्गांचे विस्तार व्हायला हवे होते, नवे मार्ग सुरू व्हायला हवे होते. प्रत्यक्षात यातलं काहीच होत नाही. रस्त्यांवरील अतिक्रमणांनी मार्गावर बस चालणं अवघड झालं आहे. ही सेवा उलट्या पायाने पळते आहे! त्यामुळे, मुंबईत गेल्या दहा वर्षांत चारचाकी वाहनांमध्ये तिप्पट आणि दुचाकींमध्ये पाचपटीपेक्षा अधिक वाढ झाली आहे. रिक्षा-टॅक्सी बहुतांश सीएनजीवर चालताहेत. पण, सीएनजीसाठी त्यांना लांबच लांब रांगा लावाव्या लागताहेत. अनधिकृत रिक्षांचा सुळसुळाट, तर इतका आहे, की त्यांची संख्या एकूण संख्येच्या ३० टक्क्यांएवढी असावी, असा अंदाज आहे. मेट्रोच्या वापराचे आकडे जाहीर होतच असतात. तात्पर्य, मुंबईच्या हवेची गुणवत्ता वाहतुकीची गुणवत्ता सुधारल्याशिवाय शक्य नाही. ती सुधारणं महापालिकेला सहज शक्य आहे. त्यांनी ही जबाबदारी आपली मानली तर!

# ऐतिहासिक बडग्या-मारबत उत्सव

## इडा-पिडा,महागाई,भ्रष्टाचारी व घोटाळेबाजांना घेऊन जा गे मारबत!!!

नागपूरातील मारबत उत्सव ही देशाच्या इतिहासातील मोठी आणि ऐतिहासिक परंपरा आहे. याच उद्देशाने नागपूरच्या १४६ वर्षांचा मारबत-बडग्या उत्सव आता आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याची तयारी नागपूर महानगरपालिकेने केली आहे.याकरीता मनपाने या उत्सवासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद केली आहे ही ऐतिहासिक दृष्ट्या नागपूरकरांसाठी गौरवाची गोष्ट आहे. मारबत उत्सवाची सुरूवात इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली.यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरूध्द मोठा लढा उभा करणे. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरितीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दीष्ट ठरले.येणारे विघ्न दुर करण्यासाठी १८८० मध्ये काळ्या मारबतीची सुरूवात झाली.यानंतर १८८४मध्ये पिवळ्या मारबतीची सुरूवात झाली.




आज काळ्या मारबतीला १४६ वर्षे पूर्ण होत आहे तर पिवळ्या मारबतीला १४२ वर्षे पूर्ण होत आहे हा एक इतिहासच म्हणावा लागेल. दोन्ही मारबती मांडण्या मागचा एकच उद्देश होता आणि आहे तो म्हणजे येणारे विघ्न, रोगराई, महागाई, दुष्काळ,भ्रष्टाचार दूर व्हावा.नागपूरसाठी आश्चर्याची गोष्ट म्हणजे आजही १४६वर्षे जुनी परंपरा त्याच पद्धतीने पारपाडल्या जाते. हा नागपूरच्या इतिहासातीलच नाही तर भारतीय इतिहासातील परंपरेची मोठी धरोहर व संस्कृतीच म्हणावी लागेल.कारण या उत्सवात संपूर्ण धर्माचे लोक मोठ्या आनंदाने सहभागी होतात.त्यामुळे ही नागपुरकरांसाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे.त्याहीवेळेस मारबतीची सलग आठ दिवस पुजा-अर्चना व्हायची आणि आताही होते.त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रम सुध्दा होतात.असेही सांगण्यात येते की मारबत ही नवसाला पावणारी असल्याची अनेकांची श्रद्धा आहे. मारबतीच्या दर्शनासाठी अनेकजन नवजात शिशूचे तोंड मारबतीच्या स्तनाला लावण्याची देखील प्रथा आहे.त्यामुळे काळ्या मारबतीचा व पिवळ्या मारबतीला पारंपरिक पद्धतीने महत्त्व दील्या जाते. मारबतीचा सन पोळ्याच्या पाडव्याला म्हणजे तान्हया पोळ्याच्या दिवशी भव्य मिरवणूक काढुन येणाऱ्या विघ्नांच्या व विघटनकारी शक्तीच्या विरोधात जय घोष करून "ईडा-पीडा,माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत" अशा घोषणांनी केल्या जाते व संपूर्ण शहरातील नागरिक यात सहभागी होवून संपूर्ण नागपूर दुमदुमते.मोठ्या पोळ्याच्या दिवशी म्हणजेच अमावस्येला घरोघरी मेड्यांच्या (पळसाचे) फांद्यांची पुजा केली जाते व दुसऱ्या दिवशी पाडव्याला चौकाचौकामध्ये पळसाच्या फांद्यांचे दहन केले जाते व घोषणा केली जाते "माशा-मुरकुट्या,रोगराईला घेऊन जा गे मारबत"अशा घोषणा केल्या जातात.

माझ्यामते सायंटिफिक दृष्ट्या किंवा सामाजिक दृष्ट्या पळसाच्या पानांच्या धुर अवश्य जंतुनाशकाचे कार्य करीत असावे यात दुमत नाही. कालांतराने या दिवसाला एवढे महत्त्व आले की भ्रष्ट व कलंकित राजनेता किंवा भ्रष्टाचारी यांच्या विरोधात त्याची प्रतीकृती काढून "बडगा" काढून निषेध केला जातो. त्याच प्रमाणे महागाई,अत्याचार, आतंकवाद, महामारी, बँक घोटाळे इत्यादींच्या विरोधात बडग्याच्या रूपात प्रतीकृती काढून निषेध नोंदविला जातो.त्याचप्रमाणे यावर्षी पेपर फुटीच्या संदर्भात सुद्धा बडग्या निघेल.यात अनेक सामाजिक संघटना (मंडळ) मोठ्या प्रमाणात सहभागी होतात.पिवळ्या व काळ्या मारबतीच्या रूपाने आज अनेक विघटनकारी शक्तीचा, अत्याचाराचा विरोध करून समाजात जनजागृती करण्याची काळ्या व पिवळ्या मारबतीपासुनच परंपरा मिळाली आहे असे मी समजतो.कारण यामुळे समाजात राजकीय पुढारी, अत्याचारी,भ्रष्टाचारी कोणते घृणास्पद कार्य करतात हे संपूर्ण उघडपणे बडग्याच्या रूपात आपल्याला व देशाला पहायला मिळते व यामुळे समाजात जनजागृती निर्माण



होत असते. म्हणजेच मारबत हा सन समाज जागृतीचा मोठा दिवस असल्याचे मी समजतो.कारण यामुळे राजकीय पुढाऱ्यांची मोठ्या प्रमाणात पोल-खोल होत असते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे १८९७ मध्ये प्लेगची साथ आली होती.

त्यानंतर १९२८मध्ये नागपूरात इंग्रजांनी हिंदू-मुस्लिम दंगली घडविल्या तरीही संपूर्ण धर्माच्या समाजबंधवांनी मारबत उत्सवाला कुठेही तडा जाऊ दिली नाही ही नागपूरसाठी व देशासाठी स्वाभिमानाची बाब आहे.त्यामुळे या दोन्ही वर्षी मारबत उत्सवात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण झाला नाही. परंतु करोना महामारीच्या काळात पहिल्यांदाच मारबत उत्सवातील मिरवणुकीत विघ्न निर्माण केले.परंतु करोना महामारी संपुष्टात आल्यानंतर देशातील संपूर्ण धर्माचे सण मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरे व्हायला लागले. मुख्यत्वे करून समाजातील वाईट गोष्टींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे मारबत उत्सव या सणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. मारबत उत्सवात बडग्यांची भुमिका मोलाची असते कारण बडगे हे देशातील विघातक गोष्टींचा निषेध नोंदविनारे असतात. यावर्षी मिरवणुकीत आपल्याला अनेक बडगे पहायला मिळेल यात महागाई, सिलेंडरची दरवाढ,पेट्रोल दरवाढ,शहरातील खड्डे,पाकिस्तान,चीन, आतंवाद, घोटाळेबाज, भ्रष्टाचारी, अत्याचारी,बेरोजगारी आणि आता पेपर फुटी इत्यादी घटनेच्या विरोधात शंभरहून अधिक बडगे यावर्षी आपल्याला पहायला मिळु शकते. मारबत उत्सवाची सुरूवात नागपूर मधुन झाली.परंतु आता मारबत उत्सव महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात साजरा केल्या जातो.आज मारबत उत्सवाच्या निमित्ताने देशात होणारे अत्याचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, महागाई,वाढता भ्रष्टाचार यांचा विरोधात समाजाने एकत्रित येण्याच्या उद्देशाने देशातील अनेक राज्यांनी नागपुरची परंपरा अंगीकारून समाजात सर्वसामान्यांवर होणारा अत्याचार देशातील१४५ कोटी जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहावा या उद्देशाने मारबत उत्सवाच्या दिवशी प्रतिकात्मक पुतळ्याचे बडगे काढून विरोध प्रगट केल्या जातो.यामुळे सुध्दा समाजात जनजागृती होतांना आपण पहातो.देशातील भ्रष्टाचाऱ्यांनी देशाला इतके पोखरून टाकले आहे की इंग्रजांनी देशाला लुटले खरे,परंतु देशातील भ्रष्ट नेत्यांनी देशाला हजार पटीने लुटले आहे.यांच्यामुळे देशात महागाईचा, बेरोजगारीचा व शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा डोंगर उभा झाला आहे.याचे प्रायश्चित्त देशातील १४५ कोटी जनता भोगत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे व गरीबांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन जा गे मारबत!

**■ लेखक : रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**

# भरपूर पाऊस पडू दे, दुष्काळाचे सावट दूर होऊ दे ; जलनायक मयंक गांधी यांचे देवाला साकडे!

## कृषीकुलमध्ये पारंपरिक पद्धतीने बैलपोळा सण उत्साहात साजरा

**■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :**

सध्या पर्जन्यमान कमी असल्याने शेतकऱ्यांसमोर दुष्काळसदृश्य परिस्थितीचे संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर "भरपूर पाऊस पडू दे, दुष्काळाचे सावट दूर होऊ दे आणि शेतकऱ्यांच्या शेतात पुन्हा हिरवळ नांदु दे" अशी प्रार्थना जलनायक मयंक गांधी यांनी कृषीकुल भगवंताकडे केली. तसेच, "कुठल्याही परिस्थितीत ग्लोबल विकास ट्रस्ट परिवार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील," अशी ग्वाही त्यांनी दिली. ग्लोबल विकास ट्रस्टच्या कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्रात बैलपोळा सण पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वर्षभर शेतात राबणाऱ्या सर्जा-राजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कृषीकुल परिवारातील सदस्यांनी बैलांची आकर्षक सजावट केली होती.

कृषीकुल परिसरातील कृषी महादेव मंदिरात सर्जा-राजाला दर्शनासाठी आणण्यात आले. त्यानंतर जलनायक मयंक गांधी यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली. पूजेनंतर बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य भरवण्यात आला. यावेळी उपस्थित कृषीकुल परिवारातील सदस्यांनी "हर हर महादेव... चहूर चहूर चांगभलं... पाऊस आला, चला घराला..." अशा घोषणांचा गजर केल्याने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. कृषीकुल येथील गोशाळेतील बैलांसह गायी व वासरांनाही नवी वेसण, घुंगरमाळा, पैंजण, म्होरकी, घाटी, झूल, गोंडे आदी विविध साहित्याने सजवण्यात आले होते. पारंपरिक वेशभूषा, पूजा-अर्चा आणि नैवेद्याच्या माध्यमातून बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी कृषीकुल परिवारातील सर्व सदस्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत बैलपोळा सणाचा आनंद द्विगुणित केला. शेतकरी आणि शेतीशी असलेले नाते अधिक दृढ करणारा हा पारंपरिक सण कृषीकुलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.



# पिके वाळली, पाणी-चाऱ्याचा प्रश्न गंभीर मा.सरपंच सौ.ज्योतीताई रामेश्वर महाराज कोकाटे

## संगम येथे पारंपरिक पद्धतीने बैलांची पूजा व गावात मिरवणूक व गाय बैलाचा विवाह मंगलाष्टक म्हणून आरती घेऊन बैल पोळा साजरा

**■ परळी वैजनाथ / प्रतिनिधी**

"संपूर्ण महाराष्ट्रात सध्या दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली असून, शेतातील पिके वाळून जात आहेत. पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे, जनावरांना चारा मिळणे कठीण झाले आहे. या संकटामुळे शेतकरी राजा चिंतेत असतानाही कर्ज काढून का होईना, आपल्या सच्च्या सोबती असलेल्या बैलांचा बैलपोळा सण मोठ्या श्रद्धेने साजरा करीत आहे. वरुणराजाने यंदा चांगली पर्जन्यवृष्टी करावी, पुढील वर्षी शेतात भरघोस उत्पन्न यावे आणि शेतकरी राजाला सुख-समृद्धी लाभावी," अशी भावपूर्ण प्रार्थना अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांनी केली.

परळी तालुक्यातील मौजे संगम येथे ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे व गिराम काळे,चव्हाण कोकाटे गल्लीत मोठ्या उत्साहात बैलपोळा सण मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी बैलांना आकर्षक साजशृंगार करण्यात आला. गळ्यात चंगाळी, शिंगांना विविध रंगांची सजावट, अंगावर रंगकाम तसेच सुंदर झुली परिधान करून बैलांना सजविण्यात आले.




सजविलेल्या बैलांना वाजत-गाजत गावातील मंदिरासमोर आणण्यात आले. यावेळी ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या हस्ते बैलांची पूजा करण्यात आली. त्यानंतर बैलांची मारोती मंदिराला आकरा प्रदक्षिणा घालण्यात आल्या. गेल्या अनेक वर्षांपासून संगम येथे ही परंपरा श्रद्धेने जपली जात आहे. हा पारंपरिक बैलपोळा पाहण्यासाठी पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने संगम येथे येतात.वर्षभर शेतात शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावून विविध शेतीकामांमध्ये अपार कष्ट करणारा बैल हा शेतकऱ्याचा खरा मित्र मानला जातो. या कष्टकरी सोबत्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैलपोळा सण साजरा केला जातो. यानिमित्ताने घराघरांत पुरणपोळीचा स्वयंपाक करून बैलांची पूजा करण्यात आली आणि त्यांना पुरणपोळी खाऊ घालण्यात आली.

विशेष म्हणजे, ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे व त्यांच्या परिवाराने बैलांची पूजा व त्यांना भोजन दिल्यानंतरच स्वतः भोजन करण्याची परंपरा यंदाही जपली. सायंकाळी बैलांना पुरणपोळीचे जेवण दिल्यानंतरच त्यांनी व परिवारातील सदस्यांनी भोजन केले.

दुष्काळाचे सावट, पिकांची झालेली अवस्था, पाण्याची टंचाई आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न अशा प्रतिकूल परिस्थितीतही संगम येथील शेतकऱ्यांनी आपल्या लाडक्या बैलांचा सण उत्साहात साजरा केला. यावेळी संगम बब्रुवान गिराम नाना, अँड प्रदीप गिराम, विश्वनाथ कोकाटे,राजाभाऊ गिराम,माणिकराव गिराम,दत्तात्रय गिराम,प्रकाश गिराम,आशोक गिराम, रावसाहेब चव्हाण,बबन कोकाटे,बबन काळे,दता गिराम, मुक्तेश्वर गिराम, संदिपान कोकाटे,अच्युत चव्हाण, अंकुश गिराम,दता चव्हाण, बाळु गिराम, परमेश्वर कोकाटे,प्रताप कोकाटे,माणिक काळे,मन्ना चव्हाण, गणेश चव्हाण, श्रीकृष्ण गिराम, सुनिल कामाळे,नंदु गिराम, प्रमोद कोकाटे,रामा यचाळे,गावातील ग्रामस्थ, नागरिक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते चाऊर चाऊर चंगभला पाऊस आला घरला चला असेम्हणत कार्यक्रमाची उत्साहात सांगता

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# जनतेच्या विश्वासाचा चेहरा... नेतृत्वाच्या विश्वासाचा आधार!

## राजेशभाऊ गित्ते : निष्ठा, जनसेवा आणि संघर्षातून घडलेले कर्तृत्ववान नेतृत्व










- **राजेश गित्ते यांनी ही कमाई केली आहे—जनतेच्या विश्वासाची!**

**आगामी काळात त्यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याला आणखी व्यापक दिशा मिळो. परळी शहर आणि तालुक्यातील सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी त्यांची धडपड अधिक जोमाने सुरू राहो. नेतृत्वाचा विश्वास आणि जनतेचा आशीर्वाद यांची साथ त्यांना कायम लाभो.**

- **प्रभू वैद्यनाथांच्या चरणी एवढीच प्रार्थना—**

**राजेशभाऊंच्या हातून जनसेवेचे हे कार्य अविरत घडत राहो...**

**त्यांच्या कार्याला यशाची नवी शिखरे लाभोत...**

**त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य कायम राहो...**


- **आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे—**

**"राजेशभाऊ" म्हणून हाक मारणाऱ्या प्रत्येक सामान्य माणसाचा विश्वास ते असाच आयुष्यभर जपत राहोत!**

**राजेशभाऊ गित्ते यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!**

- **आपला माणूस... जनतेचा माणूस... विश्वासाचा माणूस—राजेशभाऊ गित्ते!**
- **केशव गित्ते**

**अध्यक्ष :राजेशभाऊ गित्ते मित्र मंडळ, परळी वैजनाथ**



परळी शहर आणि तालुक्याच्या सामाजिक-राजकीय जीवनात असेच एक वेगळे व्यक्तिमत्त्व म्हणजे राजेशभाऊ गित्ते! आज त्यांचा वाढदिवस. निमित्त वाढदिवसाचे असले तरी, हा दिवस त्यांच्या केवळ वयात एका वर्षाची भर पडल्याचा नाही; तर एका कार्यकर्त्याने आपल्या निष्ठेने, संघर्षाने, जनसंपर्काने आणि समाजसेवेने कमावलेल्या विश्वासाचा गौरव करण्याचा दिवस आहे.

राजेश गित्ते हे नाव परळीच्या राजकारणात केवळ एका पदाधिकाऱ्याचे नाव नाही. ते नाव आहे हक्काने आपली अडचण सांगता येणाऱ्या माणसाचे... अडचणीच्या काळात फोन करता येणाऱ्या माणसाचे... आणि प्रश्न घेऊन गेल्यानंतर 'हे काम झाले पाहिजे' म्हणून पाठपुरावा करणाऱ्या माणसाचे!

महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी नेतृत्व मा. ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या विचारांवर आणि नेतृत्वावर ठाम विश्वास ठेवत राजेश गित्ते यांनी आपल्या राजकीय प्रवासात निष्ठेला सर्वोच्च स्थान दिले. माजी खासदार मा. डॉ. प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांच्या मार्गदर्शनाखालीही त्यांनी संघटनात्मक आणि सामाजिक कामात सातत्य राखले आहे.

राजकारणात पदे मिळविणे तुलनेने सोपे असते; पण पद मिळाल्यानंतरही माणूस म्हणून लोकांच्या मनात टिकून राहणे, ही खरी कसोटी असते.राजेश गित्ते यांनी हीच कसोटी आपल्या कार्यातून पार करण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्याचा प्रश्न असो, सर्वसामान्य नागरिकाची शासकीय कार्यालयातील अडचण असो, वीजेचा प्रश्न असो, पीकविम्याचा विषय असो, कर्जवसुलीची समस्या असो किंवा तहसील कार्यालय, पोलीस प्रशासन आणि शासकीय रुग्णालयाशी संबंधित एखादी अडचण असो...समोरचा माणूस कोणत्या पक्षाचा आहे, त्याची राजकीय ओळख काय आहे, यापेक्षा त्याची अडचण काय आहे, हे राजेश गित्ते यांच्यासाठी अधिक महत्त्वाचे राहिले आहे. भारतीय जनता पार्टीचे परळी तालुकाध्यक्ष, वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना गोपीनाथगड पांगरीचे संचालक आणि विविध सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभाग अशी जबाबदारीची अनेक पदे सांभाळत असताना राजेश गित्ते यांनी आपल्या कार्याची दिशा मात्र एकच ठेवली आहे—सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नाला न्याय मिळवून देणे.

- **'लोकनेता संपर्क कार्यालय' ठरले जनतेचे हक्काचे व्यासपीठ**

राजेश गित्ते यांच्या जनसंपर्काची खरी ताकद त्यांच्या 'लोकनेता संपर्क कार्यालयात' अनुभवायला मिळते. हे कार्यालय केवळ राजकीय संपर्काचे ठिकाण न राहता सर्वसामान्यांच्या समस्या, सामाजिक उपक्रम आणि विविध क्षेत्रातील गुणवंतांच्या कौतुकाचे व्यासपीठ बनले आहे.थोर महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथीचे आयोजन, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा गौरव, विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक, स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविणाऱ्या युवकांचा सन्मान अशा विविध उपक्रमांमधून समाजातील सकारात्मक शक्तीला प्रोत्साहन देण्याचे काम या माध्यमातून सातत्याने केले जाते.जनतेशी संपर्क हा केवळ निवडणुकीपुरता नसतो, तर तो वर्षभराचा असतो, या भूमिकेतून उभे राहिलेले हे संपर्क कार्यालय राजेश गित्ते यांच्या सामाजिक कार्याचे एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे.

- **विश्वास मिळविणे कठीण; टिकविणे त्याहून कठीण**

एखाद्या व्यक्तीला पद मिळू शकते, प्रसिद्धी मिळू शकते; पण विश्वास मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण कार्याची गरज असते. राजेश गित्ते यांनी आपल्या कामातून हा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न केला आहे.त्यांच्या कार्यात शेतकरी, कष्टकरी, युवक, महिला, विद्यार्थी, गरजू आणि सर्वसामान्य नागरिक यांना केंद्रस्थानी ठेवण्याची भूमिका दिसून येते. समाजकारण करताना प्रसिद्धीपेक्षा प्रत्यक्ष मदतीला प्राधान्य देणे, ही त्यांच्या कार्याची वेगळी ओळख आहे.आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना केवळ एका राजकीय पदाधिकाऱ्याला शुभेच्छा दिल्या जात नाहीत, तर जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणाऱ्या एका कार्यकर्त्याच्या धडपडीचा आणि निष्ठेचा गौरव केला जात आहे.

# कॉँग्रेस पक्षाने पुढारपण सोडून वातानुकूलित संस्कृती सोडण्याची गरज

## बीड जिल्हा कॉँग्रेसच्या बैठकीला उत्स्फूर्त प्रतिसाद; संघटन बळकटीसाठी तळागाळात जाण्याचे आवाहन

**परमेश्वर गित्ते**

बीड जिल्हा कॉँग्रेसची बैठक माजी खासदार रजनीताई पाटील यांच्या उपस्थितीत बुधवार, दि. ८ सप्टेंबर रोजी उत्साहात पार पडली. जिल्हाभरातून पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कॉँग्रेसप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने बैठकीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यात कॉँग्रेस संघटनेच्या विस्तारासाठी अनुकूल वातावरण निर्माण होत असताना आता केवळ बैठका आणि सोपस्कार न करता प्रत्यक्ष जनतेमध्ये उतरून काम करण्याची गरज असल्याचे मत या निमित्ताने व्यक्त होत आहे.

देशाच्या राजकारणात सध्या भाजप आणि कॉँग्रेस हे दोन प्रमुख राष्ट्रीय पक्ष जनाधाराच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जातात. आगामी काळातील राजकीय समीकरणांमध्ये या दोन पक्षांभोवतीच राष्ट्रीय राजकारण अधिक केंद्रित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विविध प्रश्नांवरून भाजपविरोधात निर्माण होत असलेले वातावरण, तसेच कॉँग्रेसकडे पुन्हा वाढत असलेला जनाधार यामुळे कॉँग्रेससमोर नव्या राजकीय संधी निर्माण होत असल्याचे चित्र आहे.

देशातील अल्पसंख्याक, दलित आणि विविध सामाजिक घटकांमध्ये कॉँग्रेसबद्दल असलेला पारंपरिक विश्वास हा पक्षासाठी महत्त्वाचा आधार आहे. या घटकांसोबत कॉँग्रेसने सातत्याने भूमिका घेतल्याचा दावा पक्षाकडून केला जातो. त्यामुळे या सामाजिक



घटकांना पुन्हा संघटित करून त्यांचा विश्वास अधिक दृढ करण्याची संधी कॉँग्रेससमोर आहे.

मात्र, देशपातळीवरील अनुकूल वातावरणाचा फायदा बीड जिल्ह्यातील कॉँग्रेसला कितपत करून घेता येईल, हा खरा चिंतनाचा विषय आहे. जिल्ह्यात कॉँग्रेसचा पूर्वीपासून मजबूत जनाधार राहिलेला आहे. अनेक निवडणुकांमध्ये दलित, मुस्लिम, अल्पसंख्याक तसेच विविध जाती-धर्मातील मतदारांनी कॉँग्रेसला साथ दिल्याचे चित्र पाहायला मिळाले आहे. त्यामुळे पक्षाच्या जुन्या जनाधाराला नव्या उर्जेने जोडण्याची आवश्यकता आहे.

- **'पुढारीपणा' नव्हे, कृतीची गरज**

कॉँग्रेसला सध्या सर्वाधिक गरज आहे ती आळस झटकून मैदानात उतरण्याची. 'पुढारीपणा' करण्यापेक्षा कार्यकर्ता म्हणून जनतेमध्ये मिसळणे, गावोगावी पोहोचणे आणि संघटना मजबूत करणे ही काळाची गरज आहे. पक्षात येऊ इच्छिणाऱ्या अनेक स्थानिक नेत्यांशी संपर्क साधून त्यांना योग्य वेळी पक्षाच्या प्रवाहात आणण्याची जबाबदारीही जिल्हा नेतृत्वाने स्वीकारणे आवश्यक आहे.

आज निवडणूक नसली तरी उद्याच्या निवडणुकीसाठी संघटना आजपासूनच उभी करावी लागणार आहे. इच्छुक नेत्यांशी, सामाजिक कार्यकर्त्यांशी आणि विविध क्षेत्रातील प्रभावी व्यक्तींशी सातत्याने संवाद ठेवला, तर भविष्यात कॉँग्रेसची ताकद निश्चितच वाढू शकते.

- **प्रादेशिक पक्षांसाठीही कॉँग्रेस पर्याय?**

देशातील प्रादेशिक पक्षांचे राजकीय अस्तित्व आणि प्रभाव अनेक ठिकाणी आव्हानासमोर असल्याचे चित्र आहे. अशा परिस्थितीत भाजपला पर्याय म्हणून कॉँग्रेससोबत व्यापक राजकीय आघाडी उभी राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कॉँग्रेसने स्वतःची संघटनात्मक ताकद वाढविण्याबरोबरच समविचारी पक्ष आणि विविध सामाजिक शक्तींशी संवाद वाढविणे आवश्यक आहे.

- **'वातानुकूलित' संस्कृतीला बाजूला ठेवण्याची गरज**

कॉँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी संघटनेच्या विस्तारासाठी अधिक सक्रियपणे जिल्हाभर दौरे करून कार्यकर्ते आणि सामान्य नागरिकांशी संवाद साधण्याची गरज आहे. आजच्या राजकारणात केवळ पदाधिकारी म्हणून पुढे राहण्यापेक्षा लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्या सोडविण्यासाठी संघर्ष करणे महत्त्वाचे ठरत आहे.

राहुल गांधी ज्या पद्धतीने देशभर प्रवास करून सामान्य नागरिकांशी संवाद साधत आहेत, त्याच धर्तीवर स्थानिक पातळीवरही जनतेशी थेट संपर्क वाढविण्याची आवश्यकता आहे. माजी खासदार रजनीताई पाटील आणि जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली कॉँग्रेसने हीच कार्यपद्धती स्वीकारल्यास जिल्ह्यात पक्षाला नवसंजीवनी मिळू शकते.



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, शुक्रवार, 11 सप्टेंबर 2026

# परळीतील गांधी मार्केटमध्ये कापड दुकान फोडून ५ लाख १० हजार रुपयांची रोकड लंपास








**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

परळी येथील गजबजलेल्या गांधी मार्केट परिसरातील अजय कलेक्शन या प्रसिद्ध रेडीमेड कपड्यांच्या दुकानात अज्ञात चोराने धाडसी चोरी करून गल्ल्यातील सुमारे ५ लाख १० हजार रुपयांची रोकड लांबवल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. ही घटना ९ सप्टेंबरच्या मध्यरात्री २:०० ते २:३० वाजेच्या सुमारास घडली.पद्मावती गल्ली येथील रहिवासी व व्यावसायिक वैभव वैजनाथ तमलवार (वय २८) यांचे गांधी मार्केटमध्ये अजय कलेक्शन नावाचे रेडीमेड कपड्यांचे दुकान आहे. १० सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास नेहमीप्रमाणे दुकान उघडण्यासाठी गेले असता दुकानाच्या शटरची साईडची पट्टी बाहेर आल्याचे दिसले. संशय आल्याने त्यांनी रिमोटने शटर उघडून आत प्रवेश केला असता काऊंटरच्या गल्ल्यातील रोकड गायब असल्याचे निदर्शनास आले.

त्यानंतर दुकानातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता १० सप्टेंबर रोजी मध्यरात्री २:०० ते २:३० वाजण्याच्या सुमारास एका अज्ञात इसमाने शटर उचकटून आत प्रवेश केला. दुकानाच्या आत ठेवलेली ५,१०,००० रुपयांची नगदी रक्कम (ज्यात ५०० रुपयांच्या १००० नोटा व १०० रुपयांच्या १०० नोटा) चोरून नेल्याचे तक्रारी मध्ये नमूद केली आहे . या घटनेबाबत वैभव तमलवार यांच्या फिर्यादीवरून परळी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

भरवस्तीत आणि मुख्य बाजारपेठेत घडलेल्या या मोठ्या चोरीमुळे परळीतील व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून परळी शहर पोलीस सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे अधिक तपास करत आहेत.

### ■ अजय कलेक्शन चोरीप्रकरणी बीडहून डॉग स्क्वॉड दाखल - नागरिकांची गर्दी

परळी शहरातील अजय कलेक्शन येथे रात्री झालेल्या चोरीच्या घटनेनंतर पोलिसांनी तपासाला वेग दिला आहे. चोरीच्या घटनेची पाहणी आणि चोरट्यांचा माग काढण्यासाठी बीड येथून पोलिसांचे डॉग स्क्वॉड पाचारण करण्यात आले. डॉग स्क्वॉडच्या मदतीने पोलिसांनी घटनास्थळी बारकाईने तपास करत महत्त्वाचे धागेदोरे मिळतात का, याचा शोध घेतला. दरम्यान, बीडहून डॉग स्क्वॉड आल्याची माहिती परिसरात पसरताच घटनास्थळी पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. अजय कलेक्शन चोरीप्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, चोरट्यांचा माग कधी लागतो आणि या तपासातून कोणते धागेदोरे समोर येतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मातोश्री विद्यालय विज्ञान नाट्य स्पर्धेत तालुक्यात प्रथम

**महागाव | प्रतिनिधी**

समग्र शिक्षा अभियान व पंचायत समिती महागाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञान नाट्य स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला.

विज्ञान जगताची जनजागृती व विज्ञान व मानव यांचे नाते अधिक मजबूत करण्यासाठी सदर स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत मातोश्री विद्यालयाने सादर केलेली नाटिका "सागरचा आक्रोश आणि नवसंजीवनी" लेखक विजय कदम, व मार्गदर्शक प्राचार्या अनुताई गावंडे यांच्या संकल्पनेतून साकार झालेली नाटिका तालुक्यात प्रथम क्रमांकात झळकली. नाट्य कलावंत व सहभागी



स्पर्धक अंकिता नरवाडे, राजश्री देवरकर, कल्याणी वळसे, रिया आडे, सिद्धी अडकिने, खुशी जाधव, आराध्या सावंत, आराध्या ठाकरे या स्पर्धकांनी आपली नाट्यछटा अप्रतिम कलाकार म्हणून साकारली व तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला.

नाट्य कलाकारांचे संस्थापक दिगंबर जगताप यांनी स्वागत करून शुभेच्छा दिल्या. प्राचार्या व समस्त कर्मचारी वृंद यांनी सर्वांचे स्वागत करून सदिच्छा व्यक्त केल्या.

# बैलपोळ्यानिमित्त आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानी सर्जा-राजाचे विधिवत पूजन

## 'दुष्काळाचे सावट सरू दे, बळीराजाचे राज्य येऊ दे'; आमदार सुरेश धस यांची प्रार्थना

**आष्टी प्रतिनिधी**

बळीराजाच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या बैलपोळा सणानिमित्त आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या 'अद्वैतचंद्र' निवासस्थानी गुरुवारी (दि. १० सप्टेंबर) सर्जा-राजाचे विधिवत पूजन व औक्षण करून बैलपोळा सण पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी युवा नेते जयदत्त धस, सागर धस यांच्यासह धस कुटुंबीय उपस्थित होते.



शेतकऱ्याच्या शेतीच्या कामात वर्षभर खांद्याला खांदा लावून साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणून बैलपोळ्याला विशेष महत्त्व आहे. शेतीच्या मशागतीपासून विविध कामांमध्ये बळीराजाची साथ देणाऱ्या सर्जा-राजाला या दिवशी स्नान घालून, सजवून त्याचे पूजन केले जाते. याच पारंपरिक भावनेतून धस कुटुंबीयांनीही बैलपोळा सण साजरा केला.

यावेळी सर्जा-राजाला स्नान घालून आकर्षक सजावट करण्यात आली. त्यानंतर आमदार सुरेश धस यांनी विधिवत पूजा व औक्षण करून बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शेतकरी आणि बैल यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते तसेच ग्रामीण जीवनातील बैलांचे महत्त्व यावेळी अधोरेखित झाले.

यंदा पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंतेत असताना बैलपोळ्याच्या निमित्ताने बळीराजासाठी विशेष प्रार्थना करण्यात आली. 'दुष्काळाचे सावट सरू दे, बळीराजाचे राज्य येऊ दे, वरुणराजाने कृपादृष्टी करावी, शेतशिवार हिरवेगार व्हावे आणि शेतकऱ्यांच्या कष्टाला भरघोस यश मिळावे,' अशी मनोभावे प्रार्थना आमदार सुरेश धस यांनी यावेळी केली.

# घरफोडीपासून शेतीपंप, सौरपंपांपर्यंत चोरट्यांची नजर; पोलिसांच्या कारवाईवर सवाल

## आठवडी बाजार, बसस्थानकातही चोरीच्या तक्रारी; 'तक्रार करूनही उपयोग होत नाही' अशी नागरिकांत भावना

## मुद्देमाल जप्त होत असेल तर रिकव्हरी कुठे? तपासाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह

**आष्टी प्रतिनिधी :**

आष्टी तालुक्यात घरफोडी, जनावरांची चोरी, आठवडी बाजारातील मोबाईल चोरी, शेतातील विद्युत पंप व केबल तसेच सौरपंप आणि सौरऊर्जा उपकरणांच्या चोरीच्या घटनांमुळे नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. गावागावांत चोरीच्या घटना घडत असताना चोरट्यांवर पोलिसांचा पुरेसा धाक आहे का? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

शेतकऱ्यांसाठी शेतीपंप, केबल तसेच सौरपंप ही केवळ उपकरणे नसून शेतीच्या उत्पादनाशी जोडलेली महत्त्वाची साधने आहेत. या वस्तू चोरीला गेल्यानंतर शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. चोरी झाल्यानंतर तक्रार घेऊन पोलीस ठाण्यात येणाऱ्या शेतकऱ्याला तातडीने दिलासा मिळण्याऐवजी तपासाच्या नावाखाली केवळ प्रतीक्षा करावी लागत असल्याची भावना काही शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

आष्टी शहरातील आठवडी बाजारात गर्दीचा फायदा घेत मोबाईल चोरीच्या तक्रारीही होत आहेत. बसस्थानक परिसरातही चोरीच्या घटना रोखण्यासाठी नियमित गस्त आणि प्रभावी पोलिसी नजर असणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

चोरी झाल्यानंतर तक्रार दाखल करणे, घटनास्थळाची पाहणी, सीसीटीव्ही फुटेज तपासणे, संशयितांचा शोध घेणे आणि चोरीचा मुद्देमाल परत मिळवणे ही तपासाची महत्त्वाची प्रक्रिया आहे. मात्र, या प्रक्रियेला अपेक्षित वेग मिळत नसल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. 'तक्रार केल्यानंतर पुढे काय झाले?' 'आरोपी सापडला का?' आणि 'चोरीचा मुद्देमाल परत मिळणार तरी कधी?' या प्रश्नांची उत्तरे अनेकांना मिळत नसल्याची भावना आहे.

एखाद्या चोरीच्या प्रकरणात संशयित किंवा आरोपी पोलिसांच्या ताब्यात आल्यानंतर त्याच्याकडून मुद्देमालाची पूर्णपणे रिकव्हरी झाली का, याबाबतही स्पष्टता असणे गरजेचे आहे. आरोपी पकडला, प्रकरण पुढे गेले; मात्र प्रत्यक्ष चोरी गेलेला माल संबंधित तक्रारदाराला परत मिळाला का, हा प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. त्यामुळे केवळ आरोपी पकडण्यापेक्षा चोरीचा मुद्देमाल शोधून तक्रारदाराच्या स्वाधीन करण्याच्या कारवाईवरही नागरिकांचे



लक्ष आहे.

आष्टी हे बीड जिल्ह्याच्या सीमेवरील महत्त्वाचे ठिकाण असून तालुक्यातील मोठ्या भौगोलिक क्षेत्रामुळे पोलिसांवरही मोठी जबाबदारी आहे. अशा परिस्थितीत चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी प्रभावी गस्त, सीसीटीव्हीचा वापर, गुन्हेगारांची माहिती संकलित करणे आणि प्रलंबित चोरीच्या गुन्ह्यांचा तपास जलदगतीने पूर्ण करणे आवश्यक आहे.

नागरिकांच्या मनातील संशय आणि चर्चांना पूर्णविराम देण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे पारदर्शक आणि ठोस पोलीस कारवाई. त्यामुळे आष्टी पोलिसांकडून चोरीच्या प्रकरणांमध्ये आतापर्यंत नेमकी किती कारवाई झाली, किती आरोपी पकडले, किती मुद्देमाल जप्त केला आणि प्रत्यक्षात किती मुद्देमाल तक्रारदारांना परत मिळवून दिला, याची माहिती सार्वजनिक होणार का? हा प्रश्न आता नागरिकांकडून विचारला जात आहे.

### ■ 'तक्रार करूनही उपयोग काय? तक्रारदारांची भावना

कायदा-सुव्यवस्था राखण्यासोबतच नागरिकांच्या मालमत्तेचे संरक्षण करणे ही पोलिसांची जबाबदारी आहे. चोरीच्या घटनांनंतर अपेक्षित कारवाई होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होत असेल, तर ती निश्चितच गंभीर बाब आहे. 'चोरी झाली तर पोलिसांत तक्रार करूनही काय फायदा?' अशी भावना निर्माण होऊ नये, यासाठी प्रत्येक तक्रारीचा तपास, त्याची प्रगती आणि झालेली कारवाई याबाबत पारदर्शकता आवश्यक आहे.

### ■ 'लागेबांधे आहेत का?' चर्चांना उधाण

चोरीच्या काही प्रकरणांमध्ये आरोपी सापडल्यानंतरही चोरीचा संपूर्ण मुद्देमाल परत मिळत नसल्याने नागरिकांमध्ये विविध चर्चा सुरू आहेत. काही प्रकरणांमध्ये आरोपींना कोणाचे पाठबळ आहे का? तपासाच्या प्रक्रियेत काही प्रकारचे संगनमत किंवा तडजोड होते का? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या चर्चांमध्ये तथ्य आहे की केवळ अफवा, हे पोलिसांच्या निष्पक्ष तपासातून स्पष्ट होणे आवश्यक आहे.

### ■ 'प्रकरण कोणतेही असो, सेटलमेंट?' नागरिकांमध्ये चर्चा

आष्टी पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीबाबतही नागरिकांमध्ये नाराजीची चर्चा आहे. एखादे प्रकरण घडल्यानंतर त्याचा कायदेशीर पद्धतीने तपास करून दोषींवर कारवाई होण्याऐवजी तडजोडीचा मार्ग स्वीकारला जातो का, असा सवाल काही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.